MARATHWADA MITRA MANDAL'S

# COLLEGE OF COMMERCE

Affiliated to Savitribai Phule Pune University, Re-Accredited by NAAC,
ISO 9001:2015 Certified, Awarded as Best College by Savitribai Phule Pune University

"येथे बहुतांचे हित"
MMCC
Estd. : 1986

**Dr. Kishor S. Nikam**
Principal

**१६ सप्टेंबर २०२६**

## सूचना

### "पंडित दीनदयाळ उपाध्याय महाकुंभ रोजगार मेळावा २०२६"

सर्व आजी व माजी विद्यार्थ्यांना (विशेषतः मागील ३ वर्षांत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना) कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग (जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, पुणे) यांच्या परिपत्रकानुसार राज्यभरात **"पंडित दीनदयाळ उपाध्याय महाकुंभ रोजगार मेळावा"** आयोजित करण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्यातील आस्थापनांकडून/कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात रिक्त पदे उपलब्ध झालेली असून, विद्यार्थ्यांसाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

**महत्त्वाचे तपशील:**

- **रोजगार मेळाव्याची तारीख: २९ सप्टेंबर २०२६**
- **समुपदेशन शिबीर कालावधी: २२ सप्टेंबर २०२६ पर्यंत** (संबंधित तालुक्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये - ITI).

**पात्रता:**

- शासकीय/खाजगी ITI, तांत्रिक विद्यालये, द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम, +२ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम व प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे माजी व अंतिम वर्षाचे विद्यार्थी.

**नोंदणी कशी करावी?**

इच्छुक विद्यार्थ्यांनी खालील अधिकृत लिंकवर जाऊन आपली माहिती त्वरित भरावी:

**नोंदणी लिंक:** https://forms.gle/vBTzRQKYBBuBT4em7

किंवा सोबत दिलेला QR कोड स्कॅन करून नोंदणी करावी... 👉

जिल्ह्यात उपलब्ध असणाऱ्या विपुल रोजगार संधींचा फायदा घेण्यासाठी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी आपली नोंदणी तातडीने पूर्ण करावी.

अधिक माहितीसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाशी / वर्गशिक्षकांशी संपर्क साधावा.

M. M. COLLEGE OF COMMERCE
PUNE-4

**डॉ किशोर निकम**
**प्राचार्य**

महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
**जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, पुणे**
पत्ता घोले रोड, छत्रपती शिवाजीनगर, पुणे ५

www.dvet.gov.in — Dveto.pune@dvet.gov.in

---

जा.क्र. जिव्यशिप्र/पुणे/रोजमेळा-समुपदेशन/२०२६/1050 अ — दिनांक: १५/०९/२०२६

**कार्यालयीन आदेश**

**विषय :** दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित "पंडित दीनदयाळ उपाध्याय महाकुंभ रोजगार मेळावा" सर्व संस्थांमधील माजी विद्यार्थ्यांच्या समुपदेशन शिबिर व मेळावा नोंदणीबाबत — पुनश्च सूचना.

संदर्भ : १. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. जिव्यशिप्र/पुणे/रोजमेळा-समुपदेशन/२०२६/, दिनांक ०२/०९/२०२६.
२.मा. उपायुक्त, कौशल्य विकास, पुणे यांचे व्हाट्सअप संदेश दि.१३/०९/२०२६ अन्वये प्राप्त राज्यातील "रोजगार महाकुंभ" जिल्हानिहाय उमेदवार नोंदणी संख्येचा अहवाल.

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी होणाऱ्या "पंडित दीनदयाळ उपाध्याय महाकुंभ रोजगार मेळावा" या राज्यव्यापी उपक्रमासाठी जिल्ह्यातील सर्व शासकीय,खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तांत्रिक विद्यालये, द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्था, +२ उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम संस्था तसेच प्रमाणपत्र अभ्यासक्रम संस्था यांना जास्तीत जास्त पात्र व इच्छुक माजी उमेदवारांची नोंदणी करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

तथापि, संदर्भ क्र.२ अन्वये प्राप्त राज्यस्तरीय अहवालानुसार पुणे जिल्ह्यातील नोंदणीकृत उमेदवारांची संख्या ३,८५९ इतकी असून, ही संख्या नाशिक जिल्हा (४,०५८) व नागपूर जिल्हा (४,०४६) या जिल्ह्यांच्या तुलनेत कमी असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच पुणे जिल्ह्यातील आस्थापनांकडून नोंदणीकृत करण्यात आलेल्या रिक्त जागांची संख्या इतर जिल्ह्यांच्या तुलनेत लक्षणीयरीत्या अधिक असल्याने, उपलब्ध रोजगार संधींच्या प्रमाणात जिल्ह्यातील उमेदवार नोंदणीचे प्रमाण वाढविणे अत्यावश्यक झाले आहे.

उपरोक्त बाब विचारात घेता, संदर्भ क्र.१ च्या पत्रान्वये आदेशित केल्याप्रमाणे जिल्ह्यातील सर्व संस्थांनी आपल्या माजी विद्यार्थ्यांची जास्तीत जास्त संख्येने नोंदणी https://forms.gle/vBTzRQKYBBuBT4em7 लिंकवर तातडीने पूर्ण करावी, असे या कार्यालयामार्फत पुनश्च आदेशित करण्यात येत आहे.

सदर सूचनेचे पालन न करणाऱ्या संस्थांची नावे मा. मंत्री कार्यालय, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य यांना सादर करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

तरी, वरील सर्व बाबींचे काटेकोर पालन करून विहित मुदतीत कार्यवाही तातडीने करण्यात यावी,.

SHINDE SUNIL DAGADU
Digitally signed by SHINDE SUNIL DAGADU
Date: 2026.09.14 13:34:35 +05'30'

(डॉ. सु. द. शिंदे)
जिल्हा व्यवसाय शिक्षण व
प्रशिक्षण अधिकारी, पुणे

प्रत,

१. प्राचार्य/मुख्या./संस्थाप्रमुख सर्व शासकीय खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तांत्रिक विद्यालये / द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम संस्था / +२ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम संस्था, प्रमाणपत्र अभ्यासक्रम संस्था, जिल्हा पुणे यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीकरिता.

२. सहायक आयुक्त, कौशल्य रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे यांना माहितीस्तव.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**

१. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे.

Mr. Sushil Gangane
Mr. Samartha Ambekar
plz see
16/09/26

Scanned with OKEN Scanner

Job Seeker

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग**

**जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, पुणे**

पत्ता: घोले पाटील रोड छत्रपती शिवाजीनगर पुणे ५

www.dvet.gov.in Dveto.pune@dvet.gov.in

जा क्र.: जिव्यशिप्र/पुणे/रोजमेळा-समुपदेशन/२०२६/१००९ अ दिनांक: ०२ /०९/२०२६

**कार्यालयीन आदेश**

विषय : दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित "राज्यस्तरीय महाकुंभ रोजगार मेळावा" पूर्वी जिल्ह्यातील सर्व संस्थांमधील माजी विद्यार्थ्यांचे समुपदेशन शिबिर व माजी विद्यार्थ्यांच्या मेळावा नोंदणीबाबत.

**संदर्भ** :१.व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/एटीएस/२०२६/ प्र.क्र.२८/२०२, दिनांक २६.०८.२०२६.

२. या कार्यालयामार्फत दिनांक 2 सप्टेंबर 2026 रोजी आयोजित केलेल्या(व्हीसी) बैठकीतील सूचना

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी राज्यभर एकाच दिवशी "रोजगार महाकुंभ – महाराष्ट्र" या राज्यव्यापी उपक्रमांतर्गत राज्यस्तरीय महाकुंभ रोजगार मेळावा आयोजित करण्यात येत आहे. सदर मेळाव्यात जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र व इच्छुक उमेदवारांचा सहभाग सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने, पुणे जिल्ह्यातील सर्व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तांत्रिक विद्यालये, द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्था, +2 उच्च माध्यमिक स्तरावरील व्यवसाय अभ्यासक्रम चालवणाऱ्या संस्था तसेच जिल्ह्यातील सर्व प्रमाणपत्र अभ्यासक्रम संस्था यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

**१. समुपदेशन शिबिराचे आयोजन**

दिनांक ०७ सप्टेंबर २०२६ ते २२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत, संबंधित तालुक्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये उमेदवार समुपदेशन शिबिर राबविण्यात येणार आहे.

**२. लक्ष्य गट**

उपरोक्त सर्व योजना/अभ्यासक्रमांतर्गत मागील तीन वर्षांत इयत्ता १२ वी अथवा संबंधित अभ्यासक्रम पूर्ण केलेले किमान २५ विद्यार्थी या समुपदेशन शिबिरासाठी उपस्थित असतील असे नियोजन संबंधित अभ्यासक्रमातील शिक्षकांनी करावे

**३. संस्थांनी करावयाची कार्यवाही**

1. संबंधित अभ्यासक्रम शिकविणाऱ्या शिक्षकांनी वरील लक्ष्य गटातील विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संपर्क साधावा व त्यांची संपूर्ण माहिती खालील नोंदणी लिंकवर अचूकपणे भरावी; तसेच दि.७ सप्टेंबर २०२६ पासून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये सुरू होणाऱ्या समुपदेशन शिबिरासाठी सदर विद्यार्थ्यांची नाव पत्ता मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी सह स्वतंत्र यादी ०५ सप्टे २०२६ पर्यंत तयार करावी. **नोंदणी लिंक:** https://forms.gle/vBTzRQKYBBuBT4em7

Scanned with OKEN Scanner

२. **प्रत्येक संस्थेने किमान पन्नास (५०) माजी विद्यार्थ्यांची यादी** समुपदेशनासाठी **संबंधित तालुक्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडे ०५ सप्टे २०२६ पर्यंत सादर करावी व त्याबाबतची पोहोच घ्यावी.**
३. सर्व संस्थांनी सदर तालुका औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यालयाकडून पोहोच प्राप्त यादी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालयास ई-मेलद्वारे पाठवावी.
४. अनुदानित संस्थांनी सप्टेंबर महिन्यात देय होणाऱ्या वेतन देयकासोबत सदर यादीची साक्षांकित प्रत जोडून सादर करावी.

**४. संस्थांची जबाबदारी**

संबंधित तालुक्याच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये होणारे समुपदेशन शिबिर तसेच दिनांक २९ सप्टेंबर २०२६ रोजी होणारा रोजगार मेळावा हे दोन्ही उपक्रम यशस्वी करण्यासाठी, जास्तीत जास्त संस्थेच्या माजी विद्यार्थी असलेल्या युवक-युवतींना याचा लाभ मिळावा यासाठी सर्व संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी वैयक्तिकरित्या पाठपुरावा करावा.

**५. महत्त्वाची सूचना**

ज्या संस्थांकडून वरील समुपदेशन शिबिर व रोजगार मेळावा या दोन्ही उपक्रमांना अपेक्षित प्रतिसाद मिळणार नाही, अशा संस्थांची नावे व माहिती "अकार्यक्षम संस्था" म्हणून मा. मंत्री कार्यालय, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, महाराष्ट्र राज्य यांना सादर करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

तरी, वरील सर्व बाबींचे काटेकोर पालन करून विहित मुदतीत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

SHINDE SUNIL DAGADU
Digitally signed by SHINDE SUNIL DAGADU
Date: 2026.09.02 18:09:37 +05'30'

(डॉ.सु.द.शिंदे)
**जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,पुणे**

प्रति,

१. मुख्याध्यापक/प्राचार्य/संस्थाप्रमुख सर्व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था / तांत्रिक विद्यालये / द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम संस्था / +२ उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम संस्था / प्रमाणपत्र अभ्यासक्रम संस्था, जिल्हा पुणे — यांना माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीकरिता.
२. संबंधित तालुका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पुणे जिल्हा — यांना माहितीस्तव.
३. मा. सहाय्यक आयुक्त,कौशल्य रोजगार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,पुणे — यांना माहितीस्तव

प्रत माहितीसाठी **सविनय सादर:**
१. मा. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. मा. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, पुणे.

Scanned with OKEN Scanner